महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ७४ वा | दिनांक : १४/१२/२०२४ | वार : शनिवार

## निवडणूक आयोगाकडून उत्तरे आली नाहीत : प्रकाश आंबेडकर



**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मुंबई येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाला काही प्रश्न विचारले होते, असे एक पत्र त्यांनी पाठवले होते. यावर अद्याप कुठलेही उत्तर आले नसल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले आहे. त्यामुळे खरेच संध्याकाळी ६ नंतर ७५ लाख मतदान झाले का असा प्रश्न निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हंटले आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, ईव्हीएमच्या संदर्भातले आंदोलनाला आम्ही सुरुवात केली आहे. मध्यंतरी आम्ही काँग्रेस पक्षाला आवाहन केले होते की त्यांनी या ईव्हीएमच्या विरोधाच्या संदर्भात सर्वच राजकीय पक्षांना त्यांनी बोलवावे. परंतु, काँग्रेसकडून अजून कुठलाही प्रतिसाद नाही. आम्ही लवकरच सर्व राजकीय पक्षांशी बोलणार आहोत आणि ईव्हीएमच्या संदर्भातली एक बैठक बोलावली जाणार आहे. आम्ही निवडणूक आयोगाला पत्रव्यवहार केला आहे. महाराष्ट्राचे चीफ इलेक्शन कमिशनचे प्रतिनिधि चोकलिंगम यांनी अद्यापही आमच्या पत्राला उत्तर दिलेले नाही.

पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, २० तारखेला मतदान किती झाले याची आकडेवारी आणि २३ तारखेला सर्व मतदान ज्यावेळेस मोजण्यात आले त्याची आकडेवारी देण्यात यावी अशी आम्ही मागणी केली आहे. दुसरी मागणी म्हणजे २० तारखेला जे निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर जी माहिती टाकण्यात आली आहे. त्याच्यामध्ये संध्याकाळी ६ नंतर ७५ लाख मतदान झाले असे सांगण्यात आले आहे. यावर आम्ही काही प्रश्न उपस्थित केले आहेत.

प्रकाश आंबेडकर यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. सायंकाळी ६ नंतर किती मतदान झाले याची आकडेवारी द्या. संध्याकाळी ६ वाजता जे रांगेत उभे होते या सगळ्यांना आपण स्लिप वाटली असेल तर पोलिंग बूथ नुसार किती स्लिप वाटल्या त्याची माहिती द्या. आपण कुठल्या अधिकारामार्फत ती स्लिप वाटली आहे ६ नंतरची ती जि वाटण्यात आली आहे त्या स्लिपचे व्हिडिओ क्लिप आम्हाला द्या, अशी मागणी आम्ही केली आहे.

पुढे आंबेडकर म्हणाले, यातील काही प्रश्नांची काही उत्तरे आली आहेत. नांदेड दक्षिणचे उत्तर आले आहे, औरंगाबाद पश्चिमचे उत्तर आले आहे. परंडा विधानसभा येथील काही उत्तर आले आहेत. यात जे उत्तर मिळाले आहे त्यात स्लिप किती वाटल्या गेले आणि कोणी वाटले तसेच त्याचे व्हिडिओ किती यावर कोणीही नीट उत्तर देऊ शकले नाही.

कायदा असा म्हणतो की ५ वाजून ५९ मिनिटे झाली की इलेक्शन प्रोसेस थांबवावी लागते, दरवाजे बंद केले जातात, जे आत आहेत त्यांना टोकन दिले जाते आणि ज्याच्याकडे टोकन असते त्यालाच मतदान करण्याचा अधिकार आहे. पीओ जो असतो त्याने ही सगळी कारवाई करावी लागते आणि या सगळ्याचा रेकॉर्ड त्याला मेंटेन करावा लागतो आणि हेच आम्ही त्यांना मागत आहोत. याला उत्तर असे येत आहे की हा डेटा डेटा येत नाही. त्यामुळे प्रश्न पडतो की खरंच ७५ लाख लोकांनी मतदान केले का? असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केला आहे.

## मला पदमुक्त करा, प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करा : नाना पटोले

**मुंबई :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या हाराकिरीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून आपल्याला पदमुक्त करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. माझ्या प्रदेशाध्यक्षपदाला ४ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करून मला पदमुक्त करा, असे ते आपल्या पत्रात म्हणाल्याचे सूत्रांनी म्हटले आहे.

२८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेत काँग्रेस प्रणित महाविकास आघाडीला अवघ्या ४९ जागा मिळाल्या. त्यात काँग्रेसला केवळ १७ जागांवर समाधान मानावे लागले. त्यानंतर आता काँग्रेसमध्ये या पराभवाची चिरफाड सुरू झाली आहे. त्यानुसार नाना पटोले यांनी शुक्रवारी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे आपल्याला पदमुक्त करण्याची मागणी केली आहे.

मी मागील ४ वर्षांपासून काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष आहे. लोकसभा निवडणुकीत माझ्या नेतृत्वात राज्यात काँग्रेसला चांगले यश मिळाले. पण नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाचा पराभव झाला. त्यामुळे मला आता सर्व जबाबदारीतून मुक्त करावे, असे नाना पटोले यांनी आपल्या पत्रात म्हटल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. नाना पटोले यांनी प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करून नवा प्रदेशाध्यक्ष नियुक्त करण्याची विनंतीही आपल्या पत्राद्वारे केली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे २३ नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर लगेचच नाना पटोले यांनी दिल्लीत जाऊन आपल्या राजीनाम्याची तयारी दर्शवली होती. पण पक्षश्रेष्ठींनी त्यांना तूर्त पदावर राहण्याचा सल्ला दिला होता. त्यानंतर आता पुन्हा त्यांनी पत्राद्वारे पदमुक्त करण्याची मागणी केल्यामुळे पक्षश्रेष्ठी कोणता निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दुसरीकडे, माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी नाना पटोलेंवर निशाणा साधला आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी लोकसभा निवडणुकीतील विजयाचे श्रेय घेतले होते. त्यामुळे साहजिकच त्यांच्यावरच विधानसभा निवडणुकीतील पराभवाची जबाबदारी येईल, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या पराभवानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी ईव्हीएमविरोधात रान पेटवले आहे. त्यासाठी स्वतः नाना पटोले माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडी गावाला गेले होते. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाने मतपत्रिकेवर निवडणूक घेण्याची तयारी दर्शवली, तर मी माझ्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देण्यास तयार आहे, अशी घोषणा केली होती.

## न्यायाधीशांचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

**सातारा :** येथील एका आरोपीला जामीन मिळवून देण्यासाठी न्यायाधीशानेच लाच घेतल्याचा प्रकार उघडकीस आला होता. एसीबीने या न्यायाधीशांना लाच घेताना रंगेहात पकडले होते. या प्रकरणी आरोपींच्या जामीनासाठी न्यायालयात अर्ज करण्यात आला होता. हा अर्ज सातारा जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपी न्यायाधीश धनंजय निकम यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. तसेच न्यायालयाने या न्यायाधीश महोदयांना लाच घेतल्याप्रकरणी चांगलेच फटकारले असल्याचे समजते.

सातारा सत्र न्यायालयाच्या परिसरात असलेल्या एका हॉटेलमध्ये न्यायाधीश महोदय तसेच आणखी तिघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी या आरोपींना ताब्यात घेतले होते. ५ लाखांची लाचप्रकरणी जाळ्यात अडकलेल्या धनंजय निकम यांचा सातारा सत्र न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला आहे.

सातारा लाचलुचपत अधिकाऱ्यांनी सापळा रचून न्यायाधीश निकम यांच्यासह चौघांना रंगेहात पकडले होते. त्यानंतर, आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. एका खटल्यातील संशयीत आरोपीला जामीन देण्यासाठी न्यायाधीश धनंजय निकम यांनी पाच लाख रुपयांची लाच मागितली होती. त्याबद्दल तक्रारदाराच्या माहितीवरुन लाच लुचपत विभागाने छापा मारत ही कारवाई केली होती.

सर्व सामान्य माणूस न्यायालयाकडे न्याय हक्काचे ठिकाण म्हणून बघतो. मात्र, येथील न्यायाधीशच आरोपीला सोडवण्यासाठी लाच घेत असतील तर सर्व सामान्य माणसाने कोणाकडे न्याय मागायचा? असा सवाल या प्रकरणामुळे उपस्थित झाला आहे. या घटनेमुळे न्यायालयाच्या कामकाजाला धक्का पोहोचवण्याचे काम आरोपी न्यायाधीश निकम यांनी केले आहे. तसेच घटनेचे गांभीर्य पाहता न्यायालयाने देखील यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे.

## बाधित मुलांना नुकसान भरपाई दिलीच पाहिजे : जिंदाल कंपनीच्या वायुगळतीवर उदय सामंत यांची प्रतिक्रिया



**रत्नागिरी :** येथे जिंदाल कंपनीतून वायुगळती झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागला. अनेक विद्यार्थ्यांना रुग्णालयात देखील दाखल करण्यात आले आहे. याच सोबत अनेकांची प्रकृती देखील बिघडली असल्याने एकच खळबळ उडाली होती. यावर आता माजी मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती सामंत यांनी दिली आहे.

उदय सामंत म्हणाले, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. आजच केस दाखल केली जाईल. निष्काळजीपणामुळे वायुगळती झाली. कंपनीने दिलेली आश्वासणे आणि त्याची परिपूर्णता याचा अहवाल देखील समितीने द्यावा, अशी मागणी उदय सामंत यांनी केली आहे.

पुढे ते म्हणाले, कंपनीकडून काय मिळते याबाबत नागरिकांनी देखील सजग राहावे. कंपनीकडून सुसज्ज हॉस्पिटल होईल यासाठी ग्रामस्थांनी सजग पाहिजे. ग्रामस्थांचा कोणताही गैरफायदा कंपनी उठवू नये यासाठी समिती स्थापन केली आहे. कंपनीने बाधित मुलांना नुकसान भरपाई दिलीच पाहिजे. कंपनीच्या मालकाने देखील कधीतरी रत्नागिरीमध्ये यायला पाहिजे. या संपूर्ण प्रकरणांमध्ये कंपनी दोषी आहे.

मंत्रिमंडळ विस्ताराबाबत बोलताना उदय सामंत म्हणाले, मंत्रिमंडळ विस्तारात भाजपच्या मंत्र्यांची नावे ठरली आहेत, तर त्यांनी नावे सांगावी मी अभिनंदन करतो. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि शरद पवार भेटीचा राजकीय अर्थ लावण्याची गरज नाही, तसे काही असेल तर लवकर कळेल. आम्ही तत्वाने शरद पवार यांच्या विरोधात आहोत. पण महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्यांचे योगदान असल्याचे देखील उदय सामंत यांनी म्हंटले आहे.

उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्यावर बोलताना उदय सामंत म्हणाले, मुंबई महानगरपालिकेवर महायुतीची सत्ता नक्की येणार आहे. महायुतीचे हिंदुत्व बेगडी असते तर आम्ही २३४ वर गेलो असतो का? पराभव मोठ्या मनाने स्वीकारला पाहिजे, असा सल्ला देखील त्यांनी दिला आहे. हिंदूंवरच्या अत्याचाराविरोधात झालेल्या आंदोलनात उबाठा कुठे सामील होते? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

# कोची कोचीन ओताकेसा... आणि जिल्हाधिकारी अचंबित

## जळगाव मेटे जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांनी केले जापानी भाषेत स्वागत

**छत्रपती संभाजीनगर,** :- 'कोची कोची कोचीन ओताकेसा', असे जापानी भाषेत झालेल्या स्वागताने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी अचंबित झाले. जळगाव मेटे ता. फुलंब्री या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी आज जिल्हाधिकारी यांचे थेट जापानी भाषेत स्वागत केले. विद्यार्थ्यांचे विदेशी भाषेवरील प्रभूत्व पाहून खुद्द जिल्हाधिकारी अचंबित झाले. त्यांनी या विद्यार्थ्यांचे तोंड भरुन कौतूक केले.

मनरेगा योजनेतून जिल्हा परिषद शाळांमधील सुविधांचा विकास व दशसूत्री कार्यक्रमाच्या माध्यमातून संस्कारक्षम व गुणवत्ताधारक विद्यार्थी घडविण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यासाठी फुलंब्री व छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील जि.प. शाळा मुख्याध्यापकांची कार्यशाळा आज आयोजित करण्यात आली होती.

छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक संस्थेच्या सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी राजर्षी छत्रपती शाहू महाराज सभागृहात दाखल झाले. तेव्हा प्रवेशद्वारावर जिल्हाधिकारी स्वामी यांचे स्वागत जळगाव मेटे येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी जापानी भाषेत स्वागत केले.

अचानक व अस्खलित जापानी भाषेच्या उच्चारणाने जिल्हाधिकारी सुखावले. त्यांनी नंतर विद्यार्थ्यांना या वाक्यांचा अर्थही विचारला व विद्यार्थ्यांनी त्यांना अर्थ समजावून सांगितला. सुवर्णा कांबळे या उपक्रमशील शिक्षीका विद्यार्थ्यांना जापानी भाषा शिकवित असतात. प्राथमिक व दैनंदिन जीवनातील संवादाची वाक्ये, शब्द त्यांचे अर्थ या विद्यार्थ्यांना शिकविण्यात येतात. वेगळी भाषा शिकून त्यात प्राविण्य मिळविणे, संवाद साधण्याच्या कौशल्याचा विकास व्हावा यादृष्टीने हा उपक्रम शाळेत राबविला जातो. नारायण जाजेकर हे या शाळेचे मुख्याध्यापक असून या शाळेने अनेक पुरस्कार पटकावले आहेत.

# संपूर्ण प्रशासन गाफील राहिल्यानेच हिंसाचार : नितीन राऊत

**परभणी :** शहरात आणि जिल्ह्यात पुकारलेल्या बंददरम्यान संपूर्ण प्रशासन गाफील राहिल्यानेच हिंसाचार घडला असून पोलीस यंत्रणा कोम्बिंग ऑपरेशनच्या नावाखाली दहशत निर्माण करीत असल्याचा आरोप काँग्रेसचे जेष्ठ नेते व राज्याचे माजी मंत्री डॉ.नितीन राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत केला. तसेच झालेल्या हिंसाचाराची उच्चस्तरीय चौकशी करावी आणि निरपराध व्यक्तींवरील कायदेशीर कारवाई थांबवावी, अशी मागणीही केली.

यावेळी डॉ.राऊत म्हणाले की, भारतीय संविधानाच्या शिल्पाची तोडफोड करणाऱ्यांची कसून चौकशी करावी, त्याला कोणी चिथावणी दिली होती का, हे तपासावे जेणेकरून या प्रकरणामागचा मास्टरमाईंड कोण आहे? हे समोर येईल.

बंददरम्यान झालेली जाळपोळ, दगडफेक हे प्रकार घडायला नको होते. मात्र पोलिसांची गुप्तचर यंत्रणा कार्यरत असतानाही केवळ जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांच्या गाफीलपणामुळे हिंसाचार झाल्याचा आरोप करत त्यांच्यावरही योग्य ती कारवाई करण्याची मागणी डॉ.राऊत यांनी केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ सुरक्षा नसल्यानेच हा प्रकार घडल्याचा दावा त्यांनी यावेळी केला.

हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी ९ एफआयआर दाखल केले असून ५२ जणांवर कारवाई केली आहे. ४०० जणांवर अजामीनपात्र गुन्हा नोंदविला आहे. हिंसाचार करणारे तोंड बांधून आले होते, ते कुठले होते, याचाही शोध घ्यावा आणि निरपराध व्यक्तींवर कारवाई करून निर्माण केली जात असलेली दहशत थांबवावी. एका युवकाला ४ ते ५ पोलिस घरावर जाऊन मारहाण करीत असल्याचा व्हिडीओही डॉ. राऊत यांनी मोबाईलवर पत्रकारांना दाखवला. आंबेडकरी कार्यकर्त्यांना यात लक्ष्य केले जात असल्याचाही आरोप डॉ. राऊत यांनी केला.

# महिला महाविद्यालयात गीता जयंती निमित्त ऑनलाईन प्रश्नमंजुषा

**छत्रपती संभाजीनगर** : ११ डिसेंबर २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात संस्कृत विभागाच्या वतीने मोक्षदा एकादशी, गीता जयंतीच्या उपलक्ष्य श्रीमद्भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानावर आधारित ऑनलाईन प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती.

श्रीमद्भगवद्गीता हा एक पवित्र ग्रंथ असून तो जीवन मार्गदर्शक आहे. गीतेला कुठल्याही धर्मात न बांधता त्यातील तत्वज्ञान हे युवा पिढीने वाचावे, अवगत करावे व त्यानुसार जीवन व्यतीत केल्यास जीवनाचा उत्कर्ष हा निश्चित आहे.

श्रीमद्भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाने एक उत्तम आदर्श व्यक्तिमत्व घडवता येते याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी याकरीता या प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते.

गीता जयंती दरवर्षी कार्तिक महिन्याच्या शुद्ध एकादशीला साजरी केली जाते. याचा उद्देश गीतेच्या उपदेशाचा प्रसार करणे, जीवनातील तत्त्वज्ञान समजून घेणे आणि आपल्या जीवनात त्या तत्त्वज्ञानाचे पालन करणे हा आहे.

गीता जयंतीचे औचित्य साधून जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या गीतेतील तत्वज्ञान, कर्मयोग, भक्ति, ज्ञानयोग यांसारख्या तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी जीवनात आदान-प्रदान केले जावे याकरीता संस्कृत विभाग प्रमुख डॉ. मीनल श्रीगिरीवार यांनी या प्रश्नमंजुषाचे आयोजन केले होते.

या ऑनलाईन प्रश्नमंजुषेला विद्यार्थिनींचा उदंड प्रतिसाद लाभला. गीता जयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमाला महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. प्रतिभा धोंडकर, प्रा. विशाखा जोशी यांचे सहकार्य लाभले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वत:ची प्रगती करा - डॉ. अशोक थोरात



**कन्नड (अरुण थोरात):** इंग्रजी भाषा ही आपल्या आधुनिक जगाचा एक महत्त्वाचा भाग आहे, जी विविध संस्कृती आणि देशांमधील लोकांना जोडते. व्यवसाय, शिक्षण आणि दैनंदिन जीवनात संवाद साधण्यासाठी हे आवश्यक आहे. इंग्रजी शिकणे अनेक संधी उघडते आणि तुम्हाला जागतिक स्तरावर इतरांशी संवाद साधण्यास मदत करते.

असे प्रतिपादन श्रीमान अशोकदादा गरुड शैक्षणिक व सामाजिक समूह सिल्लोड संचलित भराडी येथील ज्ञानविकास प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात बोलताना श्री. अशोक थोरात (भाषाशास्त्रज्ञ आणि प्राचार्य IASE, पुणे) यांनी व्यक्त केले. याप्रसंगी इंग्रजी भाषा कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना तसेच विद्यार्थ्यांसोबत प्रश्न उत्तरांची मनसोक्त देवाण घेवाण करत इंग्रजी विषयाची भीती काही अंशी कमी करताना डॉ.थोरात बोलत होते. विद्यार्थ्यांना संबोधित करताना इंग्रजी भाषा आपल्या जीवनात अत्यावश्यक भूमिका बजावते कारण ती संवाद साधण्यात मदत करते. जगभरातील कोणत्याही विषयाचा अभ्यास करण्यासाठी ही मुख्य भाषा आहे. विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी महत्त्वाचे आहे कारण ते त्यांचे मन विस्तृत करते, भावनिक कौशल्ये विकसित करते, नोकरीच्या संधी उपलब्ध करून जीवनाचा दर्जा सुधारते.

शिवाय भाषा हे व्यक्तीच्या गरजा, इच्छा, तक्रारी, मते, अनुभव इत्यादी व्यक्त करण्याचे एक साधन आहे. भाषेच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या भावना प्रगट करू शकते. तसेच भाषा हे माहिती आणि कोशल्ये शिकण्याचे एक साधन आहे.

भाषेमुळेच सामाजिक आंतरक्रिया चालू राहतात, माणसाची एकमेकांशी ओळख होते आणि संवाद सुरू होतो. तुम्ही जे ऐकता त्यापलीकडे जावून विचार करावा. तसेच चाकोरीबद्ध व पारंपरिक पद्धतीने तुम्ही चालत राहिल्यास तुमची प्रगती होणार नाही. केवळ नोकरी साठी शिक्षण न घेता तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्वतःच्या पूर्ण प्रगतीसाठी शिक्षण घेवून उद्योग व्यवसाय केंद्रित म्हणून शिक्षण घ्या असेही डॉ.थोरात म्हणाले.

याप्रसंगी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांकासह जिल्हास्तरीय साठी निवड झालेले गुणवंत विद्यार्थी तसेच गुणवंत शिक्षक, विद्यालय स्तरावर नोव्हेंबर महिन्यात घेतल्या गेलेल्या वैयक्तिक चाचणी परीक्षेतील गुणवंत, अबॅकस परीक्षेतील गुणवंत तसेच विद्यालयाच्या स्काऊट गाईड संघाने विभागीय फेरीतून राज्यस्तरीय फेरीत प्रवेश केल्याबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार डॉ. थोरात यांच्या हस्ते करून त्यांना भेट स्वरूपात शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ. अशोक थोरात यांच्यासह डॉ.संजय गायकवाड, ज्ञानविकास विद्यालयाचे मुख्याध्यापक, सहशिक्षकवृंद, शालेय वाहन चालकमालक यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ डिसेंबर २०२४

# एनसीसी दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर





**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे एनसीसी व एनएसएस, एचडीएफसी बँक, श्रीकृष्ण रक्तपेढी, अश्लेष भैया मोरे मित्रमंडळ यांच्या संयुक्तत विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात अस्वले सरांनी रक्तदान केल्यामुळे हृदयरोग, कँसर, मधुमेह, रक्तदाब, यासारखे रोग होण्याचा धोका कमी होतो.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठदान आहे या उक्ती प्रमाणे प्रत्येक व्यक्तिने रक्तदान करून एखाद्या गरजवंतास जीवदान देऊ शकता यासाठी अनेक सामाजिकसंस्था, महाविद्यालयाने असे कार्यक्रम घेऊन व्यक्तिचे प्राण वाचवावे असे आव्हान त्यांनी केले.

या शिबिरामध्ये एकूण ४६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एचडीएफसी बँकेचे मॅनेजर श्री आशिष बिराजदार, भीमाशंकर तोडकरी, उपस्थित होते.

प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, प्रा. गुंडाबापू मोरे सर श्री अमित मोकाशे, श्री विजय केवडकर, बँकेचे, रक्तपेढीचे सर्व कर्मचारी महाविद्यालयीन वरिष्ठ प्राध्यापक, प्राध्यापिका, कर्मचारी, मोठ्या संख्येने एनसीसी कॅडेट्स व एनएसएस स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. गिरीधर सोमवंशी रासेयो कार्यक्रमाधिकारी यांनी केले तर कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी उपस्थितांचे आभार मानले .

# मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिवपदी अश्विनी भिडे



**मुंबई :** राज्य सरकारने उच्चपदस्थ सनदी अधिकारी अश्विनी भिडे यांची मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती केली आहे. सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढत त्यांना तत्काळ आपल्या नव्या नियुक्तीचा पदभार सांभाळण्याचे निर्देश दिलेत.

आयएसएस अधिकारी अश्विनी भिडे यांच्याकडे सध्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालकपदाची जबाबदारी आहे. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांनी शुक्रवारी एका विशेष आदेशांद्वारे त्यांची मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती करण्याचे आदेश काढले.

व्ही. राधा यांनी यासंबंधीच्या आदेशात म्हटले आहे की, प्रिय श्रीमती अश्विनी भिडे, शासनाने आपली बदली केली असून, आपली नियुक्ती मा. मुख्यमंत्री यांचेच प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई या पदावर श्री. ब्रिजेश सिंह, भापोसे यांच्या जागी केली आहे. तरी आपण नवीन पदाचा कार्यभार श्री. ब्रिजेश सिंह, भापोसे यांच्याकडून त्वरीत स्वीकारावा. तसेच पुढील आदेश होईपर्यंत आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभारही आपण धारण करावा.







# महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हा सचिवपदी चाबुकस्वार, शहर सचिवपदी जाधव



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हा सचिवपदी बापूसाहेब चाबुकस्वार यांची तर शहर सचिवपदी राजेंद्र जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिलेमहाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी राहुल जी.वडमारे यांच्या अध्यक्षतेखाली सुभेदारी विश्रामगृहावर १० डिसेंबर रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

खुलताबाद तालुक्यातील कानडगाव शाखा अध्यक्षपदी करण साबळे यांची तर माटरगाव शाखाध्यक्षपदी गणेश साबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांच्या हस्ते नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीची पत्रे देण्यात आली.

यावेळी पक्षाचे जिल्हासंघटक रतन जाधव यांच्या हस्ते शाल व पुष्पहार टाकून सत्कार करण्यात आला यावेळी प्रमुख उपस्थिती, ज्येष्ठ नेते महेंद्र गवई होती अनिल इंगळे, अमित देशमुख, मुकेश मकासारे, मनोज पगारे, विकास तायडे आदींची उपस्थिती होती.